Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# मध्यवर्ती बँक व तिची कार्ये

**प्रा. वाघमारे दत्ता मनोहरराव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
लालबहादुर शास्त्री महाविद्यालय,
आष्टी, ता. परतुर, जि.जालना

## प्रस्तावना

देशाचा आर्थिक विकास साधण्यासाठी व्यापारी बँका महत्त्वाचे कार्य कसे करतात याचा अभ्यास आपण केला. व्यापारी बँका ठेवी स्वीकारणे आणि कर्ज देणे या दोन कार्याच्या अनुषंगाने पतपैशाची निर्मिती करतात. पतनिर्मितीमुळे आर्थिक विकासाला चालना मिळत असली तरी चलन पुरवठ्यात वाढ होते. व्यापारी बँका नफा प्राप्त करण्याच्या हेतूने स्थापन झालेल्या असतात. तेव्हा या हेतूसाठी बँकांनी जादा पतपैसा निर्माण करून कर्ज पुरवठा केला तर, चलन पुरवठ्यात वाढ होऊनदेशात भाववाढीची परिस्थिती निर्माण होईल असे झाले तर देशाच्या अर्थव्यवस्थेत गोंधळाचे वातावरण निर्माण होईल. आर्थिक विकासात खंड पडेल. यासाठी व्यापारी बँकांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, वेळप्रसंगी त्यांना मदत करणे देशाची चलन व पतव्यवस्था सुदृढ पायावर विकसित करण्यासाठी, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारी बँक म्हणून मध्यवर्ती बँक उदयास आली.

पहिल्या महायुध्दानंतर अनेक देशाच्या चलनव्यवस्थेत गोंधळ निर्माण झाला. अनेक देशांनी कागदी चलन अमलात आणल्यामुळे त्याच्या व्यवस्थे व नियंत्रणाचा प्रश्न निर्माण झाला. याच काळात अनेक देशात बँकांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली. परिणामी त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक वाटू लागले. अर्थव्यवस्थेची ही गरज पूर्ण करण्यासाठीच मध्यवर्ती बँकेची गरज भासू लागली. त्यामुळे अनेक देशात मध्यवर्ती बँका स्थापन करण्यात आल्या. आज जगातील सर्वच राष्ट्रांत मध्यवर्ती बँका स्थापन झालेल्या आहेत. 1656 मध्ये स्वीडनमध्ये रीश बँक ही स्वीडनची मध्यवर्ती बँक स्थापन झाली. 1694 मध्ये बँक ऑफ इंग्लंड या इंग्लंडच्या मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्यात आली. या बँकेच्या स्थापनेमुळे बँकिंग व्यवसायात एक नवे पर्व सुरू झाले. बँक ऑफ इंग्लंडचे कार्य अत्यंत यशस्वीपणे चालू होते. त्यामुळे बँक ऑफ इंग्लडचा आदर्श घेऊन जगातील अनेक राष्ट्रांनी मध्यवर्ती बँका स्थापन केल्या. भारतानेही 1 एप्रिल 1935 मध्ये मध्यवर्ती बँक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना केली.

**मध्यवर्ती बँकेची व्याख्या :-**

विविध अर्थतज्ञांनी मध्यवर्ती बँकेच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. **केन्ट :-** मध्यवर्ती बँक अशी संस्था आहे की जिला सामान्य लोकांच्या 'कल्याणाचा विचार करून चलन संख्येत वाढ व घट करण्याचे कार्य करावे लागते.

२. **प्रा. सॅम्युलसन :-** मध्यवर्ती बँक म्हणजे अशी बँक की, जी देशातील सर्वच व्यापारी बँकांच्या कार्यात सुसूत्रता आणते आणि देशातील पत पैशाचे नियंत्रण करते.

३. **क्राऊथर :-** इतर बँकांचा लोकांशी जसा संबंध असतो. तसाच मध्यवर्ती बँकेचा इतर बँकाशी संबंध असतो.

४. **आर. जी. हॉट्रे :-** चलन निर्मितीचा अधिकार असणारी आणि व्यापारी बँकांवर नियंत्रण ठेवणारी, बँकांची बँक म्हणून कार्य करणारी आणि सर्वच बँकांचा अंतिम कर्ज दाता म्हणुन कार्य करणाऱ्या बँकेला मध्यवर्ती बँक म्हणतात.

**मध्यवर्ती बँकेची कार्ये (Functions of Central Bank) :-**

मध्यवर्ती बँक देशाच्या आर्थिक धोरणाच्या संदर्भात पैसा आणि बँकनिर्मित पत पैसा बैंकिंग नियंत्रण ठेवणारी संस्था या नात्याने मध्यवर्ती बँकेला कार्य करावे लागते. व्यवस्था यांच्यावर नियंत्रण ठेवून देशातील आर्थिक व्यवस्था सुरळीत चालण्यास मदत करणे या हेतूने पुढील कार्ये करते.

1. कागदी चलनाची निर्मिती करते.
2. सरकारची बैंक म्हणून कार्य करते.
3. बँकांची बैंक म्हणून कार्य करते.
4. चलन पध्दतीची व्यवस्था पाहणे.
5. पत्र व्यवहारावर नियंत्रण ठेवणे.

1. **कागदी चलनाची निर्मिती करणे :-** कागदी चलनाची निर्मिती करणे हे मध्यवर्ती बँकेचे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. या कार्याचे श्रीमती व्हेरा स्मिथ (Vera Smith) यांना इतके महत्त्व वाटले की त्यांनी मध्यवर्ती बँकेची व्याख्या करताना 'मध्यवर्ती बँक म्हणजे चलन काढण्याचा आधिकार असणारी संस्था होय.' आज जगातील अनेक राष्ट्रांत सरकारच्या वतीने चलन काढण्याचा अधिकार मध्यवर्ती बँकेला देण्यात आलेला आहे. पूर्वीच्या काळी प्रामुख्याने इंग्लड मध्ये हा अधिकार व्यापारी बँकांना देण्यात आलेला होता. परंतु त्यात अनेक घोटाळे निर्माण होऊ लागल्याने सरकारने तो अधिकार काढून मध्यवर्ती बँकेकडे सोपविला. भारतातही चलन निर्माण करण्याचा अधिकार भारताच्या मध्यवर्ती बँकेकडे म्हणजेच म्हणजेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे देण्यात आला आहे. भारतात एक रुपयाचे चलन सोडल्यास बाकीच्या सर्व प्रकारच्या चलनाची निर्मिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया करते.

मध्यवर्ती बँकेने निर्माण केलेले चलन हे विधिग्राहय असते. मध्यवर्ती बँकेला चलन निर्मिती करताना त्याला आधारभूत म्हणून राखीव निधी ठेवावा लागतो. हा निधी किती आणि कोणत्या स्वरूपात ठेवावा हे कायद्याने ठरलेले असते. हा निधी सामान्यपणे सोने, मौल्यवान धातू सरकारी रोखे, परकीय हंडणावळ इ. स्वरूपात असतो. हा निधी ठेवण्याच्या वेगवेगळ्या पध्दती असतात. जसे निश्चित विश्वस्त निधी ( Fixed fiduciary System) प्रमाण निधी पध्दती (Proportional Reserve System) कमाल निधी पध्दती ( Fixed Maximum System) इत्यादी. निश्चित विश्वस्त निधी ठराविक मर्यादेनंतर मात्र 100% सोन्याच्या किंवा चांदीच्या तारणाची आवश्यकता असते. पध्दती ठराविक मर्यादापर्यत चलनाचा पुरवठा करण्यास तारण ठेवण्याची गरज नसते.

प्रमाण निधी पध्दतीप्रमाणे जेवढे चलन निर्माण केले असेल त्याच्या ठराविक प्रमाणाइतक्या किमतीचे सोने किंवा चांदी यांचा साठा बँकेजवळ ठेवावा लागतो. भारतात पूर्वी 40% तारण ठेवावे लागत असे. कमाल निधी पध्दतीत बँक जास्तीत जास्त किती चलन पुरवू शकते यावर मर्यादा घालण्यात येते. चलन निर्मितीसाठी तारणाचे बंधन नाही.

आधुनिक विचारसरणीनुसार देशाचे चलन व सोन्याचा साठा यांचा संबंध ठेवण्याचे कारण नाही. देशाच्या अर्थव्यवहाराबरोबर चलन पुरवठा बदलता हवा. तसेच लोकांचा सरकारवर जोपर्यंत विश्वास आहे तो पर्यत मध्यवर्ती बँकेला चलन व सोन्याचा साठा यांचा संबंध ठेवता कामा नये. केवळ सरकारेन चलनाची एक कमाल मर्यादा ठरवून द्यावी.

भारतात 1956 मध्ये किमान निधी पध्दतीचा अवलंब करण्यात आला. या पध्दती नुसार रिझर्व्ह बँक सोने, चांदी, विदेशी चलन मिळून 200 कोटी रुपयांचा निधी ठेवते. यापैकी 115 कोटी रुपयाचे सोने असावे आणि राहिलेला भाग विदेशी चलनाच्या स्वरूपात ठेवला तरी चालू शकते. या पध्दतीव्दारे रिझर्व्ह बँकेला वाटेल तेवढे चलन निर्माण करता येते.

मध्यवर्ती बँकेला चलन निर्माण करण्याची मक्तेदारी प्राप्त झाल्यामुळे चलन काढण्याच्या पध्दतीत एक सूत्रीपणा आला. तसेच चलनात एकरूपता सुरक्षितता आणि सार्वत्रिकता इत्यादी गोष्टी साध्य होतात. लोकांच्या विश्वासाला चलन पात्र ठरते. त्याचप्रमाणे चलन पुरवठ्यात लवचिकता साधता येऊन देशात पैशाचे मूल्य स्थिर राखण्यास मदत होते. एवढेच नव्हे तर चलन निर्माण करण्याचा खर्च कमी येऊन मध्यवर्ती बँकेला मिळणारा नफा देशाच्या आर्थिक विकासासाठी वापरता येतो. तसेच चलनावर नियंत्रण ठेवून किमतीच्या पातळीवर नियंत्रण ठेवता येते. मध्यवर्ती बँकेलाच चलन निर्माण करण्याचा अधिकार असल्याने, बँक देशातील चलन पुरवठ्यावर नियंत्रण ठेवून पत पैशावर नियंत्रण ठेवू शकते.

2. **सरकारची बँक म्हणून कार्य करणे**:- (Banker to the Government) मध्यवती बँकेला सरकारची बँक म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. सर्वसामान्य बँका आपल्या ग्राहकांसाठी जी विविध प्रकारची कार्ये करतात ती सर्व कार्ये मध्यवर्ती बँकेला

सरकारसाठी करावी लागतात. मध्यवर्ती बँक सरकारसाठी जी विविध प्रकारची कार्य करते त्यापैकी काही महत्त्वाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) सरकारच्या वतीने पैसा स्वीकारणे.
२) सरकारच्या वतीने देणे देऊन टाकणे.
३) सरकारच्या ठेवी सांभाळणे.
४) सरकारच्या वतीने कर्ज उभारणे.
५) सरकारच्या वतीने परकीय चलन उपलब्ध करणे.
६) आर्थिक धोरणाबाबत सल्ला देणे.
७) आंतरराष्ट्रीय व्यवहारात सरकारचे प्रतिनिधित्व करणे.

१. **सरकारच्या वतीने पैसे स्वीकारणे :-** सरकारला विविध मार्गाने उत्पन्न मिळत असते. कर, दंड. फी हे सरकारच्या उत्पन्नाचे मार्ग आहेत. सरकारच्या वतीने या रकमा गोळा करण्याचे काम मध्यवर्ती बँक करीत असते.

२. **सरकारच्या वतीने देणे देऊन टाकणे :-** आधुनिक काळात सरकारचा खर्च वाढला आहे. सरकारच्या वतीने विविध खर्च भागविण्याचे कार्य मध्यवर्ती बँक करीत असते. थोडक्यात सरकारच्या वतीने. सरकारची जी विविध प्रकारची असणारी देणी देण्याचे काम मध्यवर्ती बँक करते.

३. **सरकारच्या ठेवी सांभाळणे :-** सरकारच्या विविध विभागाची खाती मध्यवर्ती बँकेत असतात. त्याचप्रमाणे सरकारचे विविध प्रकारचे निधी मध्यवर्ती बँकेत ठेवीच्या स्वरूपात ठेवले जातात. या ठेवी सांभाळणे व त्याचा हिशेब ठेवण्याचे कार्य मध्यवर्ती बँक करते. सरकारच्या ठेवीवर मध्यवर्ती बँक सरकारला कोणत्याही प्रकारचे व्याज देत नाही. परंतु त्याच्या मोबदल्यात सरकारला विविध प्रकारच्या सोयी व सेवा उपलब्ध करून देते.

४. **सरकारच्या वतीने कर्ज उभारणे :-** सरकारला दीर्घ मुदतीच्या कर्जाची गरज असते आणि अशी कर्जे लोकांकडून घेतली जातात. मध्यवर्ती बँक सरकारच्या वतीने या कर्जाची उभारणी करते आणि मुदत संपल्यावर त्याची परतफेड करण्याचे, नियमिपणे व्याज देण्याचे कार्य करते.

५. **सरकारच्या वतीने परकीय चलन उपलब्ध करणे :** सरकारची परकीय चलनाची गरज पूर्ण करण्याचे कार्य मध्यवर्ती बँक करते. सरकारच्या वतीने परकीय चलनाची खरेदीविक्री करण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकवर असते.

६. **आर्थिक धोरणाबाबत सल्ला देणे :-** सरकारचे आणि मध्यवर्ती बँकेचे आर्थिक धारेण यामध्ये एकसूत्रता असणे आवश्यक असते. त्या दृष्टीने सरकारला आर्थिक व

बैंक विषयक धोरण आखण्यासाठी मध्यवर्ती बँक सल्ला देते. मध्यवर्ती बँकेकडे अनेक तज्ज्ञ लोक असतात. त्याचा उपयोग यासाठी करून घेतला जातो.

७. **आंतरराष्ट्रीय व्यवहारात सरकारचे प्रतिनिधित्व करणे :-** आंतरराष्ट्रीय व्यवहारात सरकारचे अनेक वेळा प्रतिनिधित्व मध्यवर्ती बँक करते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीशी होणारे व्यवहार मध्यवर्ती बँकेमार्फतच केले जाते.

### 3. बँकांची बँक म्हणून कार्य करणे:- (Banker's Bank)

देशातील बँकिंग पध्दती सुदृढ पायावर उभी करण्याची, विकसित करण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेला स्वीकारावी लागते. मध्यवर्ती बँक व्यापारी बँकेची स्पर्धक नसते. परंतु सहायक, मार्गदर्शक असते. व्यापारी बँकेला अडचणीच्या प्रसंगी मध्यवर्ती बँक मदत करते. बँकाची बँक म्हणून मध्यवर्ती बँक पुढील कार्य करते.

१) बँकने ठेवलेल्या ठेवीची रक्षण करणे
२) संकट काळचा सावकार म्हणून कार्य करणे.
३) निरसन केंद्र म्हणून कार्य करणे
४) व्यापारी बँकांना मार्गदर्शन करणे

**१) बँकेने ठेवलेल्या ठेवीचे रक्षण करणे :-** प्रत्येक व्यापारी बँकेला कायद्यानुसार याच्यावजळ असणाऱ्या रकमेपैकी कांही रोख रक्कम मध्यवर्ती बँकेत ठेवावी लागते. इंग्लडमध्ये अशी रूढी आहे. तर भारतात त्या संबंधीचे कायदे केले आहेत. प्रत्येक बँकेला आपल्या रोख रकमेपैकी ज्या प्रमाणात रक्कम मध्यवर्ती बँकेत ठेवावी लागते त्या प्रमाणाला राखीव निधी प्रमाण म्हणतात. अशा प्रकारे व्यापारी बँकांनी मध्यवर्ती बँकेत रोख रक्कम ठेवल्यामुळे, मध्यवर्ती बँकेकडे मोठ्या प्रमाणात रोखनिधी जमा होतो. या निधीमधून मध्यवर्ती बँक इतर बँकांना अर्थसाह्य देऊ शकते. व्यापारी बँकेकडे कमी रोख रक्कम राहिली तर त्याची पत निर्मिती कमी होते. राखीव निधीच्या प्रमाणात बदल करून मध्यवर्ती बँकेला पतनिर्मितीत वाढ व घट करता येते.

**२) संकटकाळाचा सावकार म्हणून कार्य करणे :-** व्यापारी बँका लोकांकडून ठेवी स्वीकारतात आणि मागताक्षणी परत करता आल्या नाहीत तरलोकांचा बँक व्यवसायावरील विश्वास नाहीसा होईल. तेव्हा असे होऊ नये यासाठी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना त्यानीसादर केलेली बिले, हुंड्या इत्यादी वटवून रोख पैसा किंवा सरकारी कर्ज रोख्याच्या वारणावर कर्ज देते. आणि बँकांना त्यांना अडचणीतून मुक्त होण्यास मदत करते. मध्यवर्ती बँकेला पैसा निर्माण करण्याचा अधिकार असल्याने आणि सर्व बँकाचा राखीव निधी त्याच्याकडे असल्याने एखाद्या बँकेला अडचणीतून काढणे शक्य होते. असे साहाय्य करताना बँकेचे व्यवहार सचोटीने चालले आहेत किंवा नाही हे देखील पाहिले जाते.

३) **निरसन केंद्र म्हणून कार्य करणे :-** मध्यवर्ती बँक, व्यापारी बँकासाठी निरसन केंद्र म्हणून कार्य करते. ग्राहकांनी आपल्या बँकावर काढलेले धनादेश दुस-या बँकात जेव्हा बमा होतात तेव्हा बँकामध्ये परस्पर देणी. घेणी निर्माण होतात. अशी देणी परस्पर फेडण्याचे ठरविले तर बँकेला मोठ्या प्रमाणात रोख रक्कम ठेवावी लागेल. परंतु अशी देणी परस्पर फेडली तर या रोख रकमेची बचत होईल. रकमेची बचत व्हावी याची उद्देशाने मध्यवर्ती बँका निरसन केंद्र म्हणून कार्य करते. निरसनगृहात दिवसाच्या शेवटी सर्व बँकाचे प्रतिनिधी एकत्र येतात व परस्पराची देणी घेणी मिटवितात. ही देणी-घेणी पूर्ण करण्यासाठी एका बँकेकडून दुसऱ्या बँकेला मध्यवर्ती बँकेवर काढलेला धनादेश दिला जातो. या पध्दतीमुळे देणी-घेणी सहजतेने पूर्ण होऊ शकतात. व्यवहारा पूर्ण करण्यासाठी चलन लागत नाही.

४) **व्यापारी बँकांना मार्गदर्शन करणे :-** मध्यवर्ती बँक व्यापारी बँकाचा मार्गदर्शन करते. त्याच्या व्यवहारावर लक्ष ठेवते. व्यापारी बँकाचे वाढ व विकास होण्याच्या दृष्टीने त्यांना आवश्यक ती मदत करते. याचाच अर्थ मध्यवर्ती बँक देशातील सर्व बँकांची मित्र, तत्त्वचिंतक आणि मार्गदर्शक अशी व्यापक भूमिका मध्यवर्ती बँक स्वीकारते,

१) **चलन पध्दतीची व्यवस्था पाहणे :-** मध्यवर्ती बँकेकडे चलन निर्माण करण्याची मक्तेदारी असते त्याचप्रमाणे चलन व्यवस्था पाहण्याचे कामही सोपविलेले असते. मध्यवर्ती बँकेला हडणावळीचा दर स्थि ठेवण्याचे कार्य करावे लागते. तसेच चलनविषयक धोरण ठरले असेल तर ते अंमलात आणण्याचे कार्य करावे लागते.

२) **पत्रव्यवहारावर नियंत्रण ठेवणे :-** पत पैशावर नियंत्रण ठेवणे हे मध्यवर्ती बँकेचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे. व्यापारी बँका लाभ प्राप्तीसाठी पत पैसा निर्माण करतात. काही वेळेस व्यापारी बँका वाजवी पेक्षा जास्त पत निर्मिती करतात. त्याचा परिणाम किमतीची पातळी, रोजगार इत्यादीवर प्रतिकूल होतो. यातूनच तेजी-मंदीचे चक्र निर्माण होते आणि देशावर आर्थिक संकट कोसळते. तेव्हा व्यापारी बँकांनी निर्माण केलेल्या पतपैशावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. यासाठी मध्यवर्ती बँक निरनिराळ्या साधनांचा म्हणजे, बँक दरात बदल, खुल्या बाजारात रोख्याची खरेदी-विक्री, रोख निधीच्या प्रमाणात बदल इत्यादीचा वापर करून देशात आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते.

**इतर कार्ये :-**

१. **आर्थिक नियोजनाला मदत करणे :-** दुस-या महायुध्दानंतर जगातील अनेक राष्ट्रांनी जलद विकासासाठी आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला. नियोजनाद्वारे शेती, उद्योग, व्यापार, वाहतुक इत्यादी क्षेत्राचा विकास साध्य करावयाचा होता. यासाठी पुरेशा प्रमाणात अर्थपुरवठचाची गरज होती. अर्थ पुरवठा झाला नाही तर विकासात अडथळे निर्माण होतात. तेव्हा विकासासाठी सर्व क्षेत्रांना अर्थपुरवठा करण्याचे काम मध्यवर्ती बँकेला सर्व व्यापारी बँकांच्या सहकार्याने पार पाडावे लागते.

**२. आकडेवारी गोळा करणे:-** मध्यवर्ती बँकेला स्वतःची चलन नीती ठरविण्यासाठी अर्थव्यवस्थेतील विविध घटकांची माहिती गोळा करावी लागते. सर्व आर्थिक व्यवहाराची माहिती, आकडेवारी गोळा करण्याचे काम मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाखाली असलेल्या काही संस्था करतात. राष्ट्रीय उत्पन्न, परकीय कर्ज, व्याजदर, विविध क्षेत्राचे उत्पादन इत्यादीची माहिती गोळा करून त्यावर निष्कर्ष काढले जातात. ते प्रसिध्द केले जातात. याचा उपयोग मध्यवर्ती बँकेला व सरकारला धोरण ठरविण्यास होतो.

**३. विविध क्षेत्राला कर्ज पुरवठा** :- मध्यवर्ती बँक शेती, उद्योग वाहतुक यासारख्या क्षेत्राला कर्ज पुरवठा करण्याचे कार्य करते. असा कर्ज पुरवठा प्रत्यक्षरीत्या न करता अप्रत्यक्षरीत्या केला जातो.

**संदर्भ सुची :-**

१) प्रा. रायखेलकर / प्रा. खेडकर :- विद्या बुक्स, औरंगाबाद
२) प्रा. डॉ. एस एम खंदारे :- कैलास पब्लीकेशन्स, औरंगाबाद
३) J.m. Keynes - General Theory of Employment Interest and money